# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ

## (वसतिगृह विभाग)

### वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे नियम

1. वसतिगृहातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी वसतीगृहाचे ओळखपत्र नेहमी जवळ बाळगावे.
2. प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी रॅगींगच्या नावाखाली कोणत्याही विद्यार्थ्यांचा/विद्यार्थीनीचा शारीरीक अथवा मानसिक छळ करणे हा कायदेशिर गुन्हा आहे. रॅगींग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
3. वसतिगृहातील प्रवेश हा फक्त एका शैक्षणिक सत्रासाठी आहे.
4. सुरक्षा रक्षकांच्या परवानगी शिवाय कोणीही वसतीगृहात प्रवेश करु नये. तसेच सुरक्षा रक्षक यांचे सोबत विनाकारण वाद घालू नये.
5. वसतिगृहात प्रथम वर्षी मिळालेला प्रवेश म्हणजे पुढील वर्षाचा प्रवेश समजू नये.
6. वसतिगृहातील पुढील वर्षात प्रवेश हा विद्यार्थ्यांच्या मागील वर्षाच्या त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि सर्व साधारण वागणुकीवर राहील.
7. वसतिगृहामध्ये प्रवेश नसलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वसतीगृहात परवानगी शिवाय आणू नये.
8. प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी वसतिगृहातील खोलीत/आवारात कुठल्याही प्रकारच्या मादक पदार्थांचे सेवन करु नये किंवा जवळ बाळगु नये.
9. कोणत्याही विद्यार्थ्यांने घातक शस्त्र जवळ बाळगणे/खोलीत ठेवणे/संस्थेच्या परिसरात आणणे/जुगार पत्ते खेळणे/भांडण करणे/ इतरांना शारीरिक व मानसिक त्रास होईल याप्रकारचे वर्तन करू नये. अशाप्रकारे कुणी आढळून आल्यास सदर विद्यार्थ्यांवर संस्थेमार्फत नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.
10. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मेस बंधनकारक राहील.
11. खोली मधुन बाहेर जातांना विद्‌युत दिवे व पंखे बंद केले आहे की नाही याची खात्री करूनच खोली बाहेर पडावे. खोलीत हीटर/इस्त्री सारखी उपकरणे वापरू नये.
12. जवळ टार्च बाळगावे जेणे करुन विद्‌युत पुरवठा खंडीत झाल्यावर उपयोगी पडेल.
13. विद्यार्थ्यांनी रात्री ९.०० वाजताच्या आत वसतिगृहात येणे बंधनकारक आहे.
14. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी रजेवर जाण्यापुर्वी कुलमंत्री/उप कुलमंत्री यांच्या कडुन लेखी अर्ज मंजुर करुन रजेवर जावे अन्यथा नियमाप्रमाणे सदर विद्यार्थी कारवाईस पात्र राहील.
15. वसतिगृह खाली करण्याचे संस्थेमार्फत निर्देश दिल्यानांतर ४८ तासाच्या पुढे खोलीचा ताबा ठेवल्यास संस्थेने वसतिगृहाकरीता ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन केले असे समजण्यात येईल व प्रसंगी वसतिगृह खाली करण्याकरीता पोलिस मदत घेणे सुध्दा अंतर्भूत असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.
16. वसतिगृह सोडतांना वसतिगृह लिपीक/कर्मचारी यांच्या कडून खोलीची तपासणी करुन त्याची संपुर्ण शहानिशा झाल्याशिवाय खोली सोडू नये.
17. सर्वांनी वसतिगृहात पाण्याचा व विजेचा वापर काटकसरीने करावा.
18. वसतिगृहातील भिंतीवर / दारावर/ खिडकीवर काहीही लिहू नये तसेच कुठल्याही शासकीय सामानाचे नुकसान करू नये. तसे करतांना आढळल्यास संबंधित विद्यार्थाकडून सदर प्रकरणी नुकसानभरपाई करुन घेण्यात येईल व वसतिग्रहाचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
19. संस्थेचे तसेच वसतिगृहाचे नियम पाळणे सर्व विद्यार्थ्यांचे बंधनकारक राहील. अन्यथा संस्थेचे प्राचार्य/कुलमंत्री विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेश तात्काळ रद्द करतील व तसा निर्णय विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

प्राचार्य

PRINCIPAL
Government Engineering College
Yavatmal

Scanned with OKEN Scanner